# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.06.2025** **वार:शुक्रवार**

1. विठूनामाच्या गजरात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचं आळंदीमधून पंढरीकडे प्रस्थान
2. माऊली आणि तुकोबांच्या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पुण्यनगरी सज्ज
3. भूसंपादन वेळेत पूर्ण करून महत्त्वाचे प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश
4. अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांच्या पार्थिव देहावर सोलापुरात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार
5. भारत आणि इंग्लंड यांच्यातला पहिला कसोटी क्रिकेट सामना आजपासून इंग्लंडमधील लीड्समध्ये आणि
6. राज्याच्या अनेक भागात जोरदार पाऊस, आजही अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा

**पालखी सोहळा**

टाळ मृदुंगाचा निनाद, विठूनामाचा गजर आणि मनात विठूरायाच्या भेटीची आस असलेले हजारो वारकरी अशा भक्तिमय वातावरणात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यानं आषाढी वारीसाठी काल आळंदीतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं. रात्री आठनंतर प्रस्थान सोहळ्याच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. रात्री नऊ साडेनऊच्या सुमारास माऊलींची पालखी मंदिराच्या मुख्य महाद्वारातून प्रदक्षिणेसाठी बाहेर पडली. त्यानंतर मंदिर आणि शहर प्रदक्षिणा झाल्यावर पालखी सोहळा आजोळघरी विसवला.

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा काल पिंपरी चिंचवड शहरात दाखल झाला. निगडीच्या भक्तीशक्ती चौकात पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी पालखीचं स्वागत केलं. त्यानंतर आकुर्डीच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये हा पालखी सोहळा मुक्कामासाठी विसावला.

जगदगुरु संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचं आज पुण्यात आगमन होणार आहे. या पालख्यांच्या स्वागतासाठी पुण्यनगरी सज्ज झाली आहे. पुणे जिल्हा प्रशासन आणि पुणे महापालिकेतर्फे वारकऱ्यांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पालख्यांच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर आज पुण्यातील विविध 26 रस्ते वेगवेगळ्या वेळेत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येतील. पालखी मुक्कामाच्या काळात नागरिकांनी मध्य पुण्यातील रस्त्याने वाहतूक टाळावी, असं आवाहन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी केलं आहे.

**फिरते चित्ररथ**

केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी केंद्रीय संचार ब्युरोनं पालखी मार्गांवर फिरत्या प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. या अंतर्गत दोन चित्ररथांचं उद्घाटन केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते काल पुण्यात झालं. पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पश्चिम क्षेत्र महासंचालक, स्मिता वत्स शर्मा यावेळी उपस्थित होत्या. यावेळी बोलताना मोहोळ म्हणाले......

**गेल्या अकरा वर्षांमध्ये जागतिक स्तरावरती वैश्विक स्तरावरती भारताचं एक वेगळं स्थान निर्माण करण्यात सरकारला यश आलं. हा सर्वसामान्य माणसाच्या कल्याणाचा विचार झाला, आणि म्हणून मला असं वाटतं की या महाराष्ट्रातल्या शेकडो वर्षांची परंपरा ही पांडुरंगाच्या ओढीनं लाखो भाविक लाखो वारकरी संत ज्ञानेश्वर महाराज संत तुकाराम महाराजांच्या पालखीसोबत चालत जातात. आज त्या वारीचा संदर्भ देताना मी म्हणेल की पाया झाला आता कळसाकडे चालून त्यामुळे**

**पांडुरंगाच्या कळसाचं ध्येय हे उद्दिष्ट आज आमचं आहे, की या जनकल्याणाची अकरा वर्ष पूर्ण होताना पाया झाला आणि आता आम्ही कळसाकडे वाटचाल करतोय.**

**योग दिन**

अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन उद्या साजरा होणार आहे. आयुष मंत्रालयानं विशाखापट्टणम इथं आयोजित केलेल्या मुख्य समारंभामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी योग प्रात्यक्षिक सादर करणार आहेत. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं देशभरातील 100 पर्यटन स्थळांवर योग दिन साजरा करण्यात येणार आहे. ऐकुया एक वृत्तांत......

**आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देशभरात विविध संस्था संघटनाही सामूहिक योग प्रात्यक्षिकं सादर करणार आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या आज पुण्यात दाखल होत आहेत. उद्याही या पालख्या पुण्यात मुक्कामी आहेत; आणि उद्या योग दिनही आहे; या निमित्ताने राज्य सरकारच्या पुढाकाराने भव्य 'वारकरी भक्तीयोग उपक्रम' आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या उपक्रमात वारकरी, विद्यार्थी, योग अभ्यासक असे साधारण 10 लाख लोक योगसाधना करणार आहेत. सांगलीमध्येही उद्या सकाळी 'भक्तियोग' हा अनोखा उपक्रम साजरा होणार आहे, याबाबत अधिक माहिती देताना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे म्हणाल्या .....**

**संपूर्ण सांगली जिल्ह्यामध्ये एकाच वेळेस एकाच तालावरती म्हणजे वारकरी तालावरती आपण योगासने करणार आहोत. सकाळी आठ ते आठ पंचेचाळीस या वेळेमध्ये संपूर्ण सांगली जिल्ह्यातील विविध केंद्रे मुख्य केंद्राशी जॉइन होणार आहेत, मुख्य केंद्र आपलं आहे. छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम सांगली आणि जर पर्जन्याची परिस्थिती असेल तरी देखील पर्यायी व्यवस्था ह्या गावागावांमध्ये आणि केंद्रांनी केलेल्या आहेत. एक मोठा विश्वविक्रम करूच परंतु सांगलीची ऐक्य सांगलीची एकी आपण याच्यातून दाखवून देऊ असं मी आवाहन करते.**

**नाशिक जिल्ह्यातही योगदिनानिमित्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठानं भव्य योग जनजागृती सत्राचं आयोजन केलं आहे. योगदिनाच्या पार्श्वभूमीवर पुण्याच्या योगशिक्षक आकांक्षा देवभानकर यांनी ताडासन या आसनाविषयी श्रोत्यांना माहिती दिली......**

**पायामध्ये खांद्या एवढं अंतर ठेवून समस्थितीत उभे राहणे दोन्ही हाताची बोटे एकमेकांमध्ये गुंपणे हात बाहेरच्या दिशेने वळवणे श्वास घेत दोन्ही हात समोरच्या दिशेने सावकाश वरच्या दिशेने ताणाव पायाच्या चवड्यावर येऊन शरीराचा तोल सांभाळणे या स्थितीत दहा ते पंधरा सेकंड थांबण्याचा प्रयत्न करावा श्वास सोडत टाचा जमिनीवर टेकवत हात खाली आणावे शरीराची उंची वाढण्यास मदतते एकाग्रता वाढते शारीरिक व मानसिक शोल सांभाळण्याची सवय लागते**

**कुछ लोग सोचते हैं योग के लिए फ्लेक्सिबिलिटी चाहिए लेकिन फ्लेक्सिबिलिटी तो सोच में होनी चाहिए ना, ना कोई बंधन,ना कोई बॉडी टाइप बचपन हो या पचपन, व्हील चेअर हो या वर्क फ्रॉम होम, योग सबका हक है... योग जीवन से जब जुडता है, एक सहज क्रिया बन जाता है, तो वो प्रतिफल उसका बेनिफिट देता रहता है... आइये इस इक्कीस जून हम सब हिस्सा बने अंतरराष्ट्रीय योग दिवस का और करे स्ट्रेच एंड चिल योग के साथ...**

**बातमीपत्र बदल**

आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम आकाशावणीवरून उद्या सकाळी साडे सहा वाजल्यापासून प्रसारित करण्यात येणार आहे. त्यामुळे पुणे केंद्रावरून सकाळी सात वाजून दहा मिनिटांनी प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या सकाळी सव्वा सहा वाजता प्रसारित करण्यात येईल.

**भूसंपादन**

राज्यातील महत्त्वाच्या सर्व प्रकल्पांचं भूसंपादन ठरलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण करून प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावावेत. तसंच भूसंपादनाअभावी एकही प्रकल्प रखडणार नाही याची संबंधित सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

यांनी दिल्या. राज्यातील महत्त्वाच्या प्रकल्पांच्या भूसंपादनाच्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. भूसंपादनाची कामं गांभीर्याने घ्यावं; याबाबत सर्वांनी गुणात्मक आणि रचनात्मक काम करावं अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

**शाहीर साबळे**

महाराष्ट्रातील प्रयोगात्मक कलांचं सखोल संशोधन आणि अभ्यास करता यावा यासाठी सांस्कृतिक कार्य विभागातर्फे पु.ल. देशपांडे कला अकदामीमध्ये स्वतंत्र संशोधन केंद्र सुरू करण्यात येणार आहे; त्याला शाहीर साबळेंचं नाव देण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृती कार्यमंत्री आशिष शेलार यांनी काल दिली.

**अंत्यसंस्कार-सोलापूर**

अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांच्या पार्थिव देहावर काल सोलापुरात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीस दलानं बंदुकीच्या तीन फैरी हवेत झाडून त्यांना मानवंदना दिली. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी चित्तमपल्ली यांच्या पार्थिवावर पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. तत्पूर्वी अक्कलकोट मार्गावरच्या निवास स्थानापासून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. चित्तमपल्ली यांचं बुधवारी रात्री वार्धक्यानं निधन झालं. ते 94 वर्षांचे होते.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंडदरम्यान पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेला आजपासून इंग्लंडमध्ये प्रारंभ होत आहे. या मालिकेतला पहिला सामना आजपासून लीडस् इथं खेळला जाणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी साडे तीन वाजता सामना सुरू होईल. विराट कोहली, रोहित शर्मा आर. अश्विन यांच्यासारख्या अनुभवी खेळाडूंच्या अनुपस्थितीत होत असलेल्या मालिकेत शुभमन गिल भारतीय संघाचं नेतृत्व करत आहे.

**राज्य पाऊस-पाणी**

राज्याच्या बहुतांश भागात काल पावसानं जोरदार हजेरी लावली. या पावसानं पुणे, नाशिक, लातूर, सातारा आणि रायगड जिल्ह्यातील धरणांच्या पाणीसाठयामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. पुण्याच्या खडकवासला धरणातून काल दुपारपासून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू करण्यात आला असून पुणे महापालिकेनं नदीकाठच्या नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदीनंही धोक्याची पातळी ओलांडली आहे. रायगड, सातारा जिल्ह्यातही मुसळधार पावसाने अनेक नदी, नाले ओढे दुथडी भरून वाहत असल्याने नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पुरामुळे आसपासच्या गावांशी संपर्क तुटल्याच्या घटनाही अनेक जिल्ह्यांमध्ये घडल्या. नाशिक जिल्ह्यातही नद्यांना पूर आला असून एकजण पुरात वाहून गेल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात मुंबई, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यासह पुणे आणि सातारा घाट परिसरात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातही काही जिल्ह्यांमध्येही जोरदार पावसाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.